<u>मुंबई विद्यापीठ</u>

दहा नोंदणीकृत पदवीधरांची अधिसभेवरील निवडणुक

नोंदणीकृत पदवीधरांची नोंदणी / मतदार यादी अद्ययावत करणे / निवडणूक २०१७ करीता मतदार यादी तयार <u>करण्यासाठी जाहीर प्रकटन</u>

मुंबई विद्यापीठाच्या पदवीधरांना या प्रकटनाद्वारे कळविण्यात येते कि, विद्यापीठाच्या अधिसभेवरील पदवीधर मतदार संघातून दहा नोंदणीकृत पदवीधारकांची नव्याने निवड करण्यासाठी नवीन मतदार यादी तयार करणे व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १३१ (३) अन्वये "नोंदणीकृत पदवीधर होऊ इच्छिणारी प्रत्येकी व्यक्ती, परिनियमाद्वारे विहित करण्यात येईल अशा नमुन्यात कुलसचिवांकडे अर्ज करील आणि अशी फी भरील." यानुसार ज्यांनी मुंबई विद्यापीठाची पदवी प्राप्त केलेली आहे अशा इच्छुक व्यक्तींची विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंद वहित नाव नोंदविण्यासाठी प्रक्रिया सुरु करण्यात येत असुन ईच्छुक पदवीधरांनी विद्यापीठाने विहित केलेला नमुना अर्ज सादर करण्याची आवश्यकता आहे .

नोंदणीकृत पदवीधर यादीत नाव नोंदणी करण्यासाठी आवश्यक माहिती :-

१. नोंदणीकृत पदवीधरांकरिता नाव नोंदणी नि:शुल्क असेल .
२. अर्ज सुरु करण्याची तारीख १ जुन, २०१७.
३. मुंबई विद्यापीठाच्या पदवीधर असलेल्या व्यक्ती नोंदणी करतील किंवा मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी नोंदणी करतील
४. पदवीधर नोंदणी अर्जाचा नमुंना विद्यापीठाच्या www.mu.ac.in (SENATE ELECTION) यां संकेत स्थळावर उपलब्ध आहे .
५. ऑनलाइनने अर्ज करताना पारपत्र आकाराचा सध्याचा फोटो, स्वाक्षरी ,पदवी परीक्षेचे प्रमाणपत्र व निवासाचा पुरावा (कोणताही एक - आधार कार्ड , निवडणूक ओळखपत्र , पारपत्र, विद्युत वापर देयक, पॅन कार्ड , वाहन चालन परवाना) स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे.
६. विवाहित महिला पदवीधरांनी लग्नानंतरच्या नवीन नावाने नोंदणी करण्यासाठी विवाह नोंदणी प्रमाणपत्र / शासन राजपत्र किंवा नविन नाव असलेले आधार कार्ड यापैकी कोणतेही एक कागदपत्र अर्जासोबत जोडावे.
७. ऑनलाईनने भरलेल्या अर्जासोबत पदवी परीक्षेचे प्रमाणपत्र व निवासाचा पुरावा (कोणतेही एक - आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पॅनकार्ड, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) अपलोड करून प्रिंट काढून खालील नमूद ठिकाणी जमा करावेत **किंवा** ऑफलाईनने भरलेल्या अर्जासोबत पदवी परीक्षेचे प्रमाणपत्र व निवासाचा पुरावा (कोणतेही एक - आधार कार्ड, निवडणूक ओळखपत्र, पॅनकार्ड, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) जोडून विद्यापीठाच्या निवडणूक विभाग कक्ष क्र. ११० विद्यापीठ मुख्य इमारत फोर्ट, परिसर, मुंबई - ४०० ०३२ येथे जमा करावेत (ऑफलाईन पर्यायाने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील 'निवडणूक पोर्टल' या लिंक वरून अर्ज **(Download)** प्राप्त करावा.
८. अर्ज करण्याची अंतिम तारीख **३० जून २०१७** राहील.
९. मुंबई विद्यापीठाच्या नोंदणीकृत पदवीधरांना त्यांच्या इच्छेनुसार पदवीधर मतदार यादीत नाव समाविष्ट करावयाचे असल्यास त्यांनी विहित केलेला अर्ज भरून सादर करणे आवश्यक राहील. दिनांक १७ मे २०१७ च्या परिनियमानुसार एकच अर्ज असेल (पूर्वीचा नमुना अर्ज 'अ' आणि 'ब' आता एकत्रीत करण्यात आलेला आहे.)
१०. ज्या विद्यार्थ्यांनी पूर्वी नोंदणी केली आहे त्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत नाव नोंदणी क्रमांक आणि पत्ता बदलला असल्यास निवासाचा पुरावा सादर करावा.
११. नवीन नाव नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी सोबत पदवी परीक्षेचे प्रमाणपत्र व निवासाचा पुरावा सादर करावा.

याच प्रमाणे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३१(२) नुसार खालील व्यक्ती नाव नोंदणीसाठी अपात्र असतील.

(क) विकल मनाचा नाही आणि सक्षम न्यायालयाने तसे घोषित केलेले नाही ;
(ख) अमुक्त नादार नाही ;
(ग) नैतिक अध :पतनाचा अंतर्भाव असेल अशा अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आलेले नाही ;
(घ) लबाडीच्या मार्गाने पदवी मिळवली नाही ; आणि
(ङ) महाराष्ट्र राज्यात कायद्याद्वारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर नाही.

I gh@&
कुलसचिव
मुबई विद्यापीठ

मुंबई : ४०० ०३२
दिनांक : ३१ मे, २०१७

University of Mumbai

Election of Ten Registered Graduates on the Senate

NOTIFICATION

For Registration of Graduates/updation of Registered Graduates & Electrol Roll of Graduates for 2017 Election.

It is hereby notified for information of the Graduates of the University that the process of election of the Senate has been started with preparation and publication of the electoral roll for the said election. As per Maharashtra Public Universities Act 2016, Section 131(3) "Every person who intends to be registered graduate shall make an application to the Register in such form and make payment of, such fees as may be prescribed by the Statutes".

The detail information for entered their names in the Register of Registered Graduate is as follows :-

1. There is no fee for Registration.
2. The Registration process will start from 1st June, 2017.
3. A person who is Graduate of University of Mumbai can register **OR** update registration & enroll for electrol roll.
4. The form of registration to Registered Graduate is available on web site of the University i.e. www.mu.ac.in(SENATE ELECTION).
5. Candidates are requested to scan their passport size photograph, signature, Convocation Certificate of degree, Proof of Residency (Any of the following - Adhar Card, PAN Card, Election Card, Passport, Bill of Electricity consumption, Driving License) as per requirement of the online registration process.
6. If there is any change in name through marriage or any other personal reason attach copy of marriage registration certificate, copy of Govt. gazette or Adhar card with new name.
7. Application forms can be filled online and submit the print-out with necessary documents (passport size photograph, signature, Convocation Certificate to course, Proof of Residency (Any of the following-Adhar Card, PAN Card, Election Card, Passport, Bill of Electricity consumption, Driving License) **OR** Offline form duly filled with necessary documents (passport size photograph, signature, Convocation Certificate to course, Proof of Residency (Any of the following - Adhar Card, PAN Card, Election Card, Passport, Bill of Electricity consumption, Driving License) is to be submited in the Election Section, Room No. 110, University of Mumbai, Main Building, Fort, Mumbai - 400 032. (Offline form can be download from Senate Election.)
8. The last date of submission of application form is 30th June, 2017.
9. All Graduates who are intending to be part of elctrol roll should fill the form given in Annexure. (Single form as per statute dated 17th May, 2017. (Earlier forms A & B are combined now))
10. Those who are already registred should give registration No. & Address Proof if Address is changed.
11. New registred graduates should give the photo copy of degree Cartificate & Address Proof.

As per Section 131(2) of the Maharashtra Public Universities Act 2016, a person will automaticuly ceased to be the Registred Graduates of the University:-

(*a*) am not of unsound mind and do not stand so declared by a competent court;
(*b*) am not an undercharged insolvent;
(*c*) have not been convicted for an offence involving moral turpitude;
(*d*) have not obtained a degree by fraudulent means ; and
(*e*) am not a registered graduate of any other University established by law in the State of Maharashtra.

Sd/-
REGISTRAR
University of Mumbai

Mumbai - 400 032 .
Date: 31st May, 2017.